


मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

दैनिक

# रयत समाचार

epaper.rayatsamachar.com

खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ४९४ वा ● बुधवार, ता. १४ जानेवारी २०२६ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

## मनपा निवडणुकीतच लोकसभेच्या निवडणुकीची रंगीत तालीम?



### विखे पिता-पुत्र करताहेत चुकांची पुनरावृत्ती

**राजेंद्र देवढे । विशेष प्रतिनिधी**

मनपा निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहोचला असताना, भाजपा-राष्ट्रवादी काँग्रेस युती व महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित करण्यात येत असलेल्या सभा-समारंभांसह प्रचार फेऱ्यांतून खासदार निलेश लंके व विखे पाटील पिता-पुत्रांची जुगलबंदी चर्चेचा विषय ठरत आहे.

महानगरपालिकेच्या निवडणुकीचा प्रचार सुरू असताना, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी, खासदार निलेश लंके यांचा नामोल्लेख टाळून बहुचर्चित सिस्पे घोटाळ्यावर भाष्य करत नव्या वादाला तोंड फोडले. दरम्यान, एका प्रकारात कमरेखाली आरोप झाल्याने काहीसे बॅकफूटवर गेलेले खासदार निलेश लंके यांनी अचानक आक्रमक होत मंत्री विखे पाटील यांच्याशी निगडीत असलेल्या एका भ्रष्टाचाराच्या प्रकरणावर भाष्य करत दंड थोपटले. त्यामुळे, उमेदवारांचा प्रचार काहीसा बाजूला पडला आणि या निवडणुकीला वेगळेच वळण लागले. सावेडी, बोल्हेगाव, केडगाव व तपोवन या प्रभागांतील उमेदवारांचा प्रचार करत असताना, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी त्यांचा पराभव 'अहमदनगर' या नावाने झाला, मात्र विजय 'अहिल्यानगर' म्हणून होणार असल्याचे विधान करत, पुढे जाऊन ते अहिल्यानगर मतदारसंघातून पुन्हा लोकसभेची निवडणूक लढवणार असल्याचे अधोरेखीत केले. यावर, खासदार निलेश लंके यांनीही विखे पाटील पिता-पुत्रांवर निशाणा साधत जशास तसे उत्तर दिले.

गेल्या लोकसभेच्या निवडणुकीत, निलेश लंके यांनी सुरू केलेल्या कोवीड सेंटरवर तोंडसुख घेण्याची मोठी चूक विखे पाटील पिता-पुत्रांनी केली होती. कारण, निलेश लंके या नावाला त्यामुळे स्वरुप प्राप्त झाले होते. तोपर्यंत प्रत्यक्षात लंके हेच डॉ. विखे पाटील यांचे लोकसभेचे प्रतिस्पर्धी उमेदवार असतील, यावर शिक्कामोर्तब झाले नव्हते. त्याची चाहूल लागली असली तरी लंके यांचा वारंवार नामोल्लेख होत गेल्याने मतदारांच्या नजरेत ते आपोआप डॉ. विखे पाटील यांच्या बरोबरीचे भासू लागले होते. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे विघटन झाल्यावर निलेश लंके यांनी सुरुवातीला शरद पवार व नंतर अजित पवार यांच्याशी जवळीक निर्माण करत स्वत:ची प्रतिमा जाणूनबुजून संभ्रमीत केली होती.

लंके यांच्या उमेदवारीवर मळभ दाटले असतानाही, विखे पाटील पिता-पुत्रांनी त्यांच्यावर सातत्याने टीका करण्याची राजकीय घोडचूक केली होती. मनपा निवडणुकीत विखे पाटील पिता-पुत्र परत तीच चूक करताना दिसत आहेत. एकंदरीत या आरोप-प्रत्यारोपांमुळे मनपा निवडणुकीत, लोकसभेच्या निवडणुकीची रंगीत तालीम सुरू झाल्याचे निदर्शनास येत आहे.

## या भ्रष्टाचाराच्या राक्षसाला संपवा, अन्यथा भविष्य अंधारात- अजित पवार


### भाजप आमदार महेश लांडगे यांच्यावर जोरदार टीका

**पुणे । रयत समाचार**

राज्याचे लक्ष लागलेल्या पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि पिंपरीतील भाजप आमदार महेश लांडगे यांच्यातील आरोप-प्रत्यारोप अधिक तीव्र झाले आहेत. भोसरी येथे झालेल्या सभेत अजित पवार यांनी महेश लांडगे यांच्यावर जहरी टीका केली. अजित पवार म्हणाले की, "जकात नाक्यावर काय उद्योग चालायचे हे मला माहिती आहे. पिंपरी-चिंचवडच्या विकासाच्या नावाखाली तब्बल ४० हजार कोटी रुपये खर्च झाले, पण त्या पैशांतून कुणी जमिनी घेतल्या, कुणाच्या प्रॉपर्टी वाढल्या, याची संपूर्ण माहिती माझ्याकडे आहे." तसेच, "भारंदाज डाव टाकून यांना फिरवून फिरवून फेकून नाही दिलं, तर पवारांची औलाद सांगणार नाही," असे आव्हानही त्यांनी दिले. महेश लांडगे यांच्यावर टीका करताना अजित पवार म्हणाले की, "बिबट्याबरोबर आता लांडगेही आले आहेत. सगळे लांडगे एका माळीचे मणी नसतात. एखादा आंबा नासका असतो; तो वेळीच



काढला नाही, तर अख्खी आळी नासवतो." पुणे शहरात वाढलेला भ्रष्टाचार आणि शहराचे होत चाललेले वाटोळे पाहून आपल्याला प्रचंड चीड येते, असेही त्यांनी नमूद केले. "काय होतास तू, काय झालास तू? जकात नाक्यावर काय उद्योग चालायचे?" असा सवाल उपस्थित करत अजित पवार म्हणाले की, "या भ्रष्टाचाराच्या राक्षसाला संपवा, अन्यथा भोसरीचं भविष्य अंधारात जाईल." तसेच, "मी महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचा अध्यक्ष राहिलो आहे. घुटना चित कसा करायचा, हे मलाही चांगलं माहिती आहे," असे प्रत्युत्तर त्यांनी दिले. पिंपरी-चिंचवडच्या विकासाच्या नावाखाली खर्च झालेले ४० हजार कोटी रुपये नेमके कुठे गेले, कुणाच्या नातेवाईकांच्या नावावर कुठे-कुठे प्रॉपर्टी खरेदी झाली, याची सगळी माहिती आपल्याकडे असल्याचा दावाही अजित पवार यांनी केला. तसेच, "यांचं अख्खं घरच या कामात आहे. इथे यूपी-बिहारसारखी परिस्थिती झाली आहे. स्वतःच्या प्लॉटवर घर बांधायचं म्हटलं, तरी धमक्या येतात. खंडण्या गोळा केल्या जात आहेत. आता ही सत्ता जायलाच हवी," असा इशाराही त्यांनी मतदारांना दिला. दरम्यान, भाजपच्या जाहीरनाम्यावरही अजित पवार यांनी जोरदार टीका केली. मेट्रो मोफत करण्याच्या आपल्या घोषणेवर भाजपचे मंत्री चंद्रकांत पाटील यांनी टीका केल्यानंतर अजित पवार म्हणाले की, "मेट्रो मोफत करायची घोषणा मी अभ्यास करूनच केली आहे. त्यासाठी कॅबिनेटच्या मान्यतेची गरज नाही." भाजपच्या जाहीरनाम्यात ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठी पीएमपीएमएल व मेट्रो मोफत करण्याच्या घोषणेवरही त्यांनी टोला लगावत, "७५ वर्षांचे किती ज्येष्ठ रोज प्रवास करतात? आता काय ७५ होईपर्यंत वाट पाहायची?" असा सवाल उपस्थित केला. या आरोप-प्रत्यारोपांमुळे पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीची लढत अधिकच रंगतदार होत चालली आहे.



## नगरपरिषद उपनगराध्यक्षपदी मंगल कोकाटे

### संजय भागवत, अजय भंडारी स्वीकृत नगरसेवक

**पाथर्डी । नितीन गटाणी**


पाथर्डी नगरपरिषदेच्या नूतन नगराध्यक्ष व नगरसेवकांच्या पहिल्या सर्वसाधारण सभेत उपनगराध्यक्षपदासाठी मंगल कोकाटे, तर स्वीकृत नगरसेवकपदी संजय भागवत व अजय भंडारी यांची बिनविरोध निवड करण्यात आली. मंगळवारी नगरपरिषद सभागृहात पिठासीन अधिकारी तथा नगराध्यक्ष अभय आव्हाड यांच्या अध्यक्षतेखाली ही निवड प्रक्रिया पार पडली. उपनगराध्यक्षपदासाठी मंगल कोकाटे यांनी दोन अर्ज दाखल केले होते. त्यांच्या अर्जाला बजरंग घोडके, अमोल गर्जे, बंडू बोरुडे व डॉ. जगदीश मुने यांनी सूचक व अनुमोदक म्हणून शिफारस केली. कोणताही विरोधी अर्ज दाखल न झाल्याने मंगल कोकाटे यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. दरम्यान, स्वीकृत नगरसेवक पदासाठी भारतीय जनता पार्टीकडून एकूण अकरा इच्छुकांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. यामध्ये संजय भागवत, रमेश गोरे, अजय भंडारी, मुकुंद लोहिया, मुकुंद गर्जे, विनायक भापकर, श्रीकांत जाजू, आदिनाथ डोमकावळे, डॉ. सुहास उरणकर, रमेश काटे व अनिल बोरुडे यांचा समावेश होता. तर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) कडून योगेश रासने यांनी अर्ज दाखल केला होता. अर्ज छाननीदरम्यान आवश्यक शपथपत्र व गटनेत्याची शिफारस नसल्याने योगेश रासने यांचा अर्ज बाद करण्यात आला. तसेच भाजपचे मुकुंद गर्जे यांना अशासकीय संघटनेचा पदाधिकारी अनुभवाची अट पूर्ण न झाल्याने, तर रमेश गोरे व विनायक भापकर यांना अभियांत्रिकी पदविधारक ही अट पूर्ण न झाल्याने त्यांचे अर्ज प्रांत अधिकारी प्रसाद मते यांनी बाद केले.

भारतीय जनता पार्टीच्या नगराध्यक्षांसह १६ नगरसेवकांची गट नोंदणी पूर्ण झाल्याने स्वीकृत नगरसेवकपदी संजय भागवत व अजय भंडारी यांची बिनविरोध निवड झाली. नगरपरिषद निवडणूक काळात राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) कडून नगराध्यक्षपदासाठी संजय भागवत यांना उमेदवारी देण्यात आली होती. मात्र उमेदवारी अर्ज माघारीच्या शेवटच्या दिवशी भागवत यांनी अर्ज माघार घेतल्याने भाजपचे उमेदवार अभय आव्हाड यांचा मार्ग सुकर झाला होता. मंगळवारी भाजपकडून संजय भागवत यांची स्वीकृत नगरसेवक म्हणून वर्णी लागली. निवडणुकीत नगराध्यक्षपदी भाजपचे अभय आव्हाड व १४ नगरसेवक निवडून आल्याने भाजपचा एक व विरोधी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचा एक स्वीकृत नगरसेवक होणार, असे मानले जात होते. मात्र भाजपच्या गटनोंदणीवेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या उमेदवार वंदना टेके यांनी भाजपच्या गटात प्रवेश केल्याने भाजपचे दोन स्वीकृत नगरसेवक निश्चित झाले. या निवड प्रक्रियेच्या वेळी मंगल कोकाटे, शारदा गर्जे, नंदकुमार शेळके, बंडूशेठ बोरुडे, बजरंग घोडके, अमोल गर्जे, सुभाष बोरुडे, जगदीश मुने, संजय देशमुख, प्रतीक नांगरे, किरण खेडकर, वर्षा मोरे, ज्योती पवार, मनीषा उदमले, देविदास पवार, रेखा हंडाळ, सविता भापकर, मंगल सोनटक्के आदी नगरसेवक उपस्थित होते. निवडीनंतर आमदार मोनिका राजळे यांच्या हस्ते नूतन उपनगराध्यक्ष व स्वीकृत नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. निवडणूक प्रक्रिया नगरपरिषदेचे मुख्याधिकारी संतोष लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

## आचारसंहिता लागू; तरीही उमेदवारांना प्रचाराची परवानगी

**मुंबई । रयत समाचार**

राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकांसाठी गेले महिनाभर सुरू असलेली प्रचार रणधुमाळी आज संपणार आहे. आचारसंहितेनुसार मतदानाच्या काही तास आधी प्रचार थांबवला जातो. त्यानुसार काल, मंगळवार, ता. १३ जानेवारी सायंकाळी ५.३० वाजता प्रचार सभा, रॅली आणि जाहीर कार्यक्रमांना पूर्णविराम मिळाला आहे. मात्र याच पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाने घेतलेल्या एका निर्णयामुळे नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. निवडणूक आयोगाच्या निर्णयानुसार प्रचाराची अधिकृत मुदत संपल्यानंतरही उमेदवारांना घरोघरी जाऊन वैयक्तिक प्रचार करता येणार आहे. मात्र या काळात राजकीय पक्षांना किंवा उमेदवारांना पत्रके वाटण्यास मनाई करण्यात आली आहे. दोन दिवसांपूर्वी सर्व उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींची बैठक पार पडली होती. त्यामध्ये सायंकाळी ५.३० वाजता प्रचार थांबला तरी उमेदवारांना मतदानाच्या दिवसापर्यंत घरोघरी भेटी देऊन प्रचार करता येईल, असे स्पष्ट करण्यात आले. आचारसंहितेनुसार राजकीय पक्ष व उमेदवारांना १३ जानेवारी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत अधिकृत प्रचार करता येणार आहे. मात्र १३ ते १५ जानेवारी या कालावधीत, म्हणजेच मतदानाच्या दिवसापर्यंत, उमेदवार व अपक्ष उमेदवारांना घरोघरी जाऊन मतदारांशी संवाद साधण्याची परवानगी देण्यात आली आहे. मात्र कोणत्याही प्रकारची पत्रके, प्रचार साहित्य वाटण्यास मनाई करण्यात आली असल्याचे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.



दरम्यान, निवडणूक आयोगाच्या या निर्णयामुळे मतदानाच्या दिवसापर्यंत नियमांचे उल्लंघन होण्याची शक्यता असल्याचा आक्षेप विरोधी पक्षांनी घेतला आहे. काँग्रेससह अन्य पक्षांनी या निर्णयावर नाराजी व्यक्त केली असून, यापूर्वी अशा प्रकारचा निर्णय कधीही घेण्यात आला नव्हता, असा सवाल उपस्थित करण्यात आला आहे. तरीही निवडणूक आयोगाने हा निर्णय कायम ठेवला असून, भविष्यात हा निर्णय वादग्रस्त ठरण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक जाहीर

### ५ फेब्रुवारीला मतदान तर ७ ला निकाल

**मुंबई । रयत समाचार**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राजकारणाला पुन्हा एकदा वेग आला असून राज्य निवडणूक आयोगाने १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीची अधिकृत घोषणा केली आहे. महापालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू असतानाच ही घोषणा झाल्याने राज्यातील राजकीय हालचालींना अधिक गती मिळाली आहे.

राज्यात सध्या महापालिका निवडणुकांसाठी प्रचार अंतिम टप्प्यात असून १५ जानेवारी रोजी मतदान, तर १६ जानेवारी रोजी निकाल जाहीर होणार आहे. अशा पार्श्वभूमीवर आज राज्य निवडणूक आयोगाची पत्रकार परिषद पार पडली. या परिषदेत आयोगाने जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणूक कार्यक्रमाची माहिती दिली. राज्य निवडणूक आयुक्तांनी सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ज्या जिल्हा परिषदांमध्ये ५० टक्क्यांपेक्षा कमी आरक्षण आहे, अशा जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमध्ये निवडणुका घेणे बंधनकारक आहे. त्या अनुषंगाने राज्यातील १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांसाठी निवडणूक प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. जिल्हा परिषद निवडणुकीत प्रत्येक मतदाराला दोन मते देणे बंधनकारक असणार आहे. त्यापैकी एक मत जिल्हा परिषदेसाठी, तर दुसरे मत पंचायत समिती गणासाठी द्यावे लागणार आहे. तसेच या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज प्रक्रिया ऑफलाईन पद्धतीने राबविण्यात येणार असल्याची माहितीही आयोगाने दिली.

**या जिल्ह्यांमध्ये होणार निवडणूक : कोकण विभाग : रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे विभाग : पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, मराठवाडा विभाग : छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव, लातूर.**

### जिल्हा परिषद निवडणूक कार्यक्रम

**उमेदवारी अर्ज दाखल : १६ ते २१ जानेवारी २०२६, अर्ज छाननी : २२ जानेवारी २०२६, अर्ज माघारी : २७ जानेवारी २०२६, दुपारी ३ वाजेपर्यंत, अंतिम उमेदवार यादी व चिन्ह वाटप : २७ जानेवारी, दुपारी ३.३० नंतर, मतदान : ५ फब्रुवारी २०२६, मतमोजणी : ७ फेब्रुवारी २०२६, सकाळी १० वाजता.**

## ज्ञानाचे ग्राहक नव्हे, तर ज्ञाननिर्माते घडवणे ही काळाची गरज- डॉ. सिंग

### गोवा आंतरशालेय विज्ञान मेळावा उत्साहात संपन्न



**मडगाव । रयत समाचार**

गोव्यातील विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, संशोधनवृत्ती व नवकल्पनांना चालना देणारा दोन दिवसीय गोवा आंतरशालेय विज्ञान मेळावा २०२६ (तारे जमीन पर) हा उपक्रम शनिवार, ता. १० जानेवारी रोजी मडगाव येथील सम्राट गार्डन येथे उत्साहात संपन्न झाला. बोर्ड ऑफ इनोव्हेटिव्ह एज्युकेशन, गोवा यांच्या वतीने आणि ए. जे. अकॅडमी फॉर रिसर्च अँड डेव्हलपमेंट यांच्या सहकार्याने ९ व १० जानेवारी रोजी हा संशोधनाधारित विज्ञान मेळावा आयोजित करण्यात आला होता. या विज्ञान मेळाव्यात १० शाळांमधील २०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. भौतिकशास्त्र, जीवशास्त्र आणि पर्यावरणशास्त्र या विषयांवर वैयक्तिक व गट पातळीवर एकूण ५४ संशोधन प्रकल्प विद्यार्थ्यांनी सादर केले. दोन दिवसांत ५०० हून अधिक विद्यार्थी प्रेक्षकांसह संशोधक, शैक्षणिक संस्था प्रमुख, विज्ञान व सामाजिक कार्यकर्ते, प्राध्यापक, पालक आणि सामान्य नागरिकांनी मेळाव्यास भेट दिली. त्यामुळे संपूर्ण परिसर विज्ञान व संशोधनाचे केंद्र बनला होता. समारोप समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून सीएसआयआर नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओशनोग्राफी, गोवा येथील मुख्यालय संचालक डॉ. सुनील कुमार सिंग उपस्थित होते. आपल्या भाषणात त्यांनी सांगितले की, भारताकडे अमाप बौद्धिक क्षमता आहे; मात्र ती प्रत्यक्षात उतरवण्यासाठी तरुण पिढीला सक्षम करणे अत्यावश्यक आहे. विद्यार्थ्यांनी केवळ पैसा कमावण्यापुरते ध्येय न ठेवता ज्ञाननिर्मितीवर भर द्यावा, असे आवाहन त्यांनी केले. भारत मोठ्या प्रमाणावर तंत्रज्ञान आयात करतो; मात्र देशाकडे स्वतःची तंत्रज्ञानाधारित उत्तरे निर्माण करण्याची क्षमता आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. संशोधनाचा थेट संबंध बाजारपेठेशी जोडला गेला पाहिजे, तरच त्याचा समाजाला प्रत्यक्ष लाभ होईल, असेही त्यांनी नमूद केले. पाश्चिमात्य देश ज्ञाननिर्मितीवर मोठी गुंतवणूक करत असून, भारतातही शासनाकडून भांडवल उपलब्ध होत आहे; मात्र अशा विज्ञान मेळाव्यांसारख्या उपक्रमांतून सातत्याने विद्यार्थ्यांना प्रेरणा देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. मेळाव्यात सादर झालेले प्रकल्प दर्जेदार असून भारतीय विज्ञानाचे भविष्य सक्षम हातात असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यापूर्वी, ए. जे. अकॅडमी फॉर रिसर्च अँड डेव्हलपमेंटचे संचालक मुहम्मद अब्दुल्ला जावेद यांनी विज्ञान मेळाव्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी आपले विचार स्पष्टपणे मांडण्याची तसेच प्रश्नांना आत्मविश्वासाने उत्तरे देण्याची क्षमता दाखवली असल्याचे त्यांनी नमूद केले. पालक, विद्यार्थी आणि शैक्षणिक संस्था यांच्या सहकार्यामुळे नावीन्यपूर्ण संशोधन कल्पना साकार झाल्या असून, पालकांनी विद्यार्थ्यांमधील सुप्त गुण ओळखून त्यांना योग्य दिशा देणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. समारोप कार्यक्रमाची सुरुवात 'दैवी ज्ञानवाणी'ने झाली. त्यानंतर बोर्ड ऑफ इनोव्हेटिव्ह एज्युकेशनच्या सचिव मीनाज भानू यांनी स्वागतपर भाषण केले. शिक्षक व पालकांनी विज्ञान मेळाव्यामुळे विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासात व संशोधनाभिमुखतेत झालेल्या सकारात्मक बदलांविषयी अनुभव सांगितले. दोन दिवसांच्या उपक्रमाचे क्षणचित्र दाखवणारे व्हिडीओ सादरीकरणही यावेळी सादर करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. वालीउर रहमान यांना भारताचा सर्वोच्च विज्ञान सन्मान 'शांती स्वरूप भटनागर पुरस्कार' मिळाल्याबद्दल गौरविण्यात आले. भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला होता. डॉ. रहमान यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन आणि चौकस शिक्षणपद्धतीबाबत मार्गदर्शन केले. यानंतर बोर्ड ऑफ इनोव्हेटिव्ह एज्युकेशनचे अध्यक्ष आसिफ हुसेन यांचे अध्यक्षीय भाषण झाले. सहभागी शाळांना स्मृतिचिन्हे देण्यात आली. परीक्षक व मान्यवरांचा सत्कार तसेच पारितोषिक वितरण सोहळा पार पडला. कार्यक्रमाचा समारोप आभार प्रदर्शन व राष्ट्रगीताने झाला.

# शिवसेना-राष्ट्रवादीकडून स्वतंत्र गटनिर्मिती

## मुंढे, पठाण यांच्याकडे गटनेतृत्वाची जबाबदारी



**शेवगाव | लक्ष्मण मडके**

शेवगाव नगरपरिषदेतील राजकारणात महत्त्वाची हालचाल घडत असून शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) या दोन्ही पक्षांनी आपापली स्वतंत्र गटनिर्मिती पूर्ण केली आहे. या गटनिर्मितीमुळे नगरपरिषदेतील राजकीय समीकरणे स्पष्ट झाली असून, आगामी काळात स्थानिक राजकारण अधिक गतिमान होणार असल्याचे संकेत मिळत आहेत. शिवसेना पक्षाकडून नगरसेविका माया अरुण मुंढे यांची गटनेतेपदी निवड करण्यात आली आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) पक्षाने नगरसेवक वजीर पठाण यांच्यावर गटनेतृत्वाची जबाबदारी सोपवली आहे.

सोमवारी अहमदनगर येथील जिल्हाधिकारी कार्यालयात अधिकृत प्रक्रियेनुसार दोन्ही पक्षांची गटनिर्मिती करण्यात आली. शिवसेनेच्या गटनिर्मितीवेळी नगरसेवक आशुतोष डहाळे, अमर पुरनाळे, शिवानी काथवटे यांच्यासह शिवसेना नेते अरुण मुंढे, साईनाथ आधाट, उदय मुंढे उपस्थित होते. सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर शिवसेनेचा स्वतंत्र गट अधिकृतपणे अस्तित्वात आला. माया मुंढे यांच्या नेतृत्वाखाली नगरपरिषदेतील जनहिताच्या प्रश्नांवर ठाम भूमिका घेतली जाईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) पक्षानेही स्वतंत्र गट स्थापन करत नगरसेवक वजीर पठाण यांची गटनेतेपदी नियुक्ती केली. यावेळी नगरसेवक सुनील काकडे, रिजवान शेख, उज्ज्वला मुंढे यांच्यासह तालुकाध्यक्ष हरीश भारदे, शरद सोनवणे, एजाज काझी उपस्थित होते. गटनिर्मितीनंतर नगरपरिषदेत पक्षाची भूमिका अधिक सक्षमपणे मांडण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला. दोन्ही पक्षांच्या गटनिर्मितीमुळे शेवगाव नगरपरिषदेतील राजकीय चित्र अधिक स्पष्ट झाले असून सत्ताधारी व विरोधी पक्षांच्या भूमिका ठरल्या आहेत.

येत्या काळात शहराच्या विकासाशी संबंधित प्रश्न, शेवगावकरांच्या जिव्हाळ्याचा पाणी प्रश्न, नागरी सुविधा, मूलभूत सोयीसुविधा आणि जनहिताच्या मुद्द्यांवर नगरपरिषदेत जोरदार चर्चा व निर्णय होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. गटनिर्मितीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर उपस्थित सर्व पदाधिकारी व नगरसेवकांनी एकत्र येत सामूहिक छायाचित्रण केले. या घडामोडीमुळे शेवगावच्या राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले असून पुढील राजकीय हालचालींकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



# जिजाऊंच्या विचारांचा वारसा पुढे नेऊन सामाजिक एकतेसाठी कार्य केले पाहिजे- जावेद तांबोळी

## मखदूम सोसायटी, रहेमत सुलतान फाऊंडेशनकडून जिजाऊ जयंती साजरी

**अहमदनगर | आबीद खान**

राजमाता जिजाऊ या केवळ छत्रपती शिवाजी महाराजांच्या माताच नव्हत्या, तर त्या संपूर्ण समाजाच्या मार्गदर्शक होत्या. त्यांनी दिलेले संस्कार, स्वराज्याची प्रेरणा आणि न्यायाची शिकवण आजही आपल्याला दिशा दाखवते.

आजच्या पिढीने जिजाऊंच्या विचारांचा वारसा पुढे नेऊन शिक्षण, संस्कार आणि सामाजिक एकतेसाठी कार्य करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते जावेद अब्बास तांबोली यांनी केले. मखदूम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी व रहमत सुलतान फाऊंडेशन यांच्या वतीने जिजाऊ जयंतीनिमित्त ऐतिहासिक वस्तू संग्रहालय येथे असलेल्या राजमाता जिजाऊ यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी रहमत सुलतान फाऊंडेशनचे अध्यक्ष युनुसभाई तांबटकर, मखदूम सोसायटीचे अध्यक्ष आबीद दूल्हे खान, जावेद तांबोली, नाणी संग्राहक पंकज मेहेर, आदिल शेख, जावेद मास्टर तसेच दुर्गप्रेमी व दुर्ग छायाचित्रकार ठाकूरदास परदेशी आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमप्रसंगी उपस्थितांनी राजमाता जिजाऊ यांच्या सामाजिक, शैक्षणिक व राष्ट्रनिर्मितीतील योगदानाला उजाळा दिला. जिजाऊंच्या संस्कारातूनच छत्रपती शिवाजी महाराजांसारखा महान योद्धा घडला, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

# डॉ. श्याम गणवीर यांना 'लीडरशिप व्हिजिनरी एक्सलन्स अवॉर्ड'



**अहमदनगर | विजय मते**

अहिल्यानगर येथील विळद घाट परिसरातील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कॉलेज ऑफ फिजिओथेरपीचे प्राचार्य डॉ. श्याम गणवीर यांना सांगली येथे आयोजित राष्ट्रीय परिषदेत 'Leadership Visionary Excellence Award' प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाच्या स्कूल ऑफ फिजिओथेरपी, सांगली यांच्या वतीने आयोजित "फिझीनोव्हा २.० राष्ट्रीय परिषद २०२६" या दुसऱ्या राष्ट्रीय आंतरविद्याशाखीय फिजिओथेरपी परिषदेला देशभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विविध राज्यांतील तज्ज्ञ अभ्यासक, फिजिओथेरपी व्यावसायिक व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. परिषदेत फिजिओथेरपी प्रॅक्टिसचे भविष्य, विकास व सहकार्य या विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. या परिषदेचा शुभारंभ स्व. डॉ. पतंगराव कदम यांच्या स्मृतीस अभिवादन करून करण्यात आला. यावेळी सांगलीचे जिल्हाधिकारी अशोक काकडे, दिल्ली येथील फिजिओथेरपीस्ट इंडियन उपाध्यक्ष डॉ. सुरेश बाबू रेड्डी, भारती विद्यापीठ मेडिकल सायन्सेसच्या कार्यकारी संचालिका डॉ. अस्मिता जगताप, पुणे येथील भारती विद्यापीठाचे डॉ. प्रकाश गुरव, तसेच जी.एम.सी. मिरजचे अधिष्ठाता आदी मान्यवर उपस्थित होते.

या परिषदेत डॉ. श्याम गणवीर यांना त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वासाठी, शैक्षणिक योगदानासाठी, संघटन कौशल्यासाठी तसेच फिजिओथेरपी क्षेत्रातील सातत्यपूर्ण व प्रगतिशील कार्याबद्दल 'Leadership Visionary Excellence Award' प्रदान करण्यात आला. त्यांच्या कार्यपद्धतीमुळे संस्थेचा शैक्षणिक दर्जा उंचावला असून विद्यार्थी व शिक्षकांमध्ये संशोधनाची अभिरुची वाढली, तसेच फिजिओथेरपी व्यवसायात नाविन्यपूर्ण विचार रुजवण्यास त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. एकूणच ही परिषद अतिशय फलदायी, ज्ञानवर्धक व समाधानकारक ठरल्याचे सहभागींच्या प्रतिक्रियांतून स्पष्ट झाले.



# गोरेश्वर विद्यालयात जिजाऊ जयंती व राष्ट्रीय युवा दिन उत्साहात साजरा

**पारनेर | रयत समाचार**

श्री गोरेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, गोरेगाव येथे राजमाता जिजाऊ यांची जयंती व स्वामी विवेकानंद यांचा जन्मदिन (राष्ट्रीय युवा दिन) मोठ्या उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षक वैरागर होते. प्राचार्य जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व अध्यक्ष निवडीचा विषय किरण उमाप यांनी मांडला, तर सुजाता नरसाळे यांनी त्याला अनुमोदन दिले. इयत्ता पाचवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊंच्या शौर्याच्या कथा तसेच स्वामी विवेकानंदांचे प्रेरणादायी विचार आपल्या भाषणांतून प्रभावीपणे मांडले. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. यावेळी मंगेश काळे, सुरेखा सुंबे व जयश्री माथेसुळ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना जिजाऊंच्या संस्कारांचे व स्वामी विवेकानंदांच्या ध्येयवादाचे महत्त्व स्पष्ट केले. कार्यक्रमास कैलास खिलारी, प्रा. लोंढे, आकाश ठोकळ, कमल औटी व अनुपमा नांगरे यांची उपस्थिती व मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे आभार ज्योती वाघ यांनी मानले.

# केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धेत वांगदरी शाळेचे घवघवीत यश



**श्रीगोंदा | माधव बनसुडे**

जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत आयोजित वांगदरी केंद्रस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा (सन २०२५२६) जि. प. प्राथमिक शाळा, वांगदरी जुनी येथे उत्साहात पार पडल्या. या स्पर्धांमध्ये जि. प. प्रा. शाळा, वांगदरी जुनी येथील विद्यार्थ्यांनी सर्वच खेळांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत घवघवीत यश मिळवले असून त्यांची पुढील बीटस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या स्पर्धांचे उद्घाटन श्रीगोंदा तालुक्याचे युवा नेते दिग्विजय राजेंद्र नागवडे यांच्या हस्ते झाले. यावेळी वांगदरी गावचे सरपंच तुषार नागवडे उपस्थित होते. सांघिक खेळांमध्ये मुलांच्या कबड्डी तसेच मुलींच्या खो-खो या दोन्ही स्पर्धांत जि. प. प्रा. शाळा, वांगदरी जुनी संघ विजयी ठरला. वैयक्तिक खेळांमध्ये मुलांच्या उंच उडी व लांब उडी स्पर्धेत अर्षद रफिक सय्यद याने तृतीय क्रमांक पटकावला. मुलींच्या उंच उडी व लांब उडी स्पर्धेत खुशी दत्तात्रय कांबळे हिने प्रथम क्रमांक मिळवला. ५० मीटर धावणे स्पर्धेत मुला व मुली गटात अनुक्रमे अर्षद रफिक सय्यद व खुशी दत्तात्रय कांबळे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. सर्व विजयी संघांसाठी शिक्षणप्रेमी कमलाकर गोरे यांच्या वतीने रुपये दहा हजार किमतीच्या ट्रॉफी देण्यात आल्या. वैयक्तिक स्पर्धांतील विजेत्यांसाठी आदरणीय राहुल उबाळे यांच्या तर्फे मेडल्स देण्यात आले. शाळेच्या वतीने दोघांचेही मनःपूर्वक आभार मानण्यात आले. या यशासाठी मुख्याध्यापिका प्रतिभा नागवडे तसेच सहशिक्षक नितीन शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. यामध्ये अविनाश उबाळे, महादेव भालेराव, निखिल कांबळे, सतीश दिवेकर, चेतन राऊत, शब्बीर पठाण, कल्पक राऊत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर युवा प्रतिष्ठान वांगदरी जुनी, तुषार भगत, ग्रामपंचायत वांगदरी, सोनाली श्रीकृष्ण नागवडे (अध्यक्ष, शालेय व्यवस्थापन समिती) तसेच सर्व शिक्षक, पालक व ग्रामस्थांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# बाळासाहेब देशमुख यांच्या 'मंतरलेल्या वाड्यात'ने प्रेक्षक मंत्रमुग्ध

**अहमदनगर | रयत समाचार**

राज्यस्तरीय चौथे ग्रामीण मराठी साहित्य संमेलन निमगाव वाघा येथे परिवार कार्यालयात उत्साहात संपन्न झाले. संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी सरोज आल्हाट होत्या, तर संमेलनाध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक सुभाष सोनवणे होते. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा पुरस्कार सोहळा ॲड. राजेश कावरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.

कार्यक्रमाचे आयोजक माननीय नानासाहेब डोंगरे यांनी प्रास्ताविक केले. पुरस्कार वितरण, कवी संमेलन, कथाकथन, पोवाडा असे विविध कार्यक्रम संमेलनात संपन्न झाले.. संमेलनात कथालेखक बाळासाहेब देशमुख यांनी 'मंतरलेल्या



वाड्यात' ही थरारक कथा सादर केली. गावातील टारगेट मुलांनी कीर्तनकार विसाजी विसपुते यांना गावाबाहेरील इनामदारांचा वाडा कार्यक्रमासाठी सुचविला. गावकऱ्यांकडून मिळालेली माहिती खरी असल्याचा विश्वास वाटल्याने ते वाड्यात आले. वाड्यात प्रवेश करताच भिंतींवर चिकटलेली कोळ्यांची जाळी, वडाची वाळलेली पाने व काटक्या अंगणात पडलेल्या, तोंडासमोरून उडणारी वटवाघळे अशा दृश्यांचे प्रभावी वर्णन कथेतून उलगडत गेले आणि थराराला सुरुवात झाली. बाळासाहेब देशमुख यांनी देहबोली, आवाजातील चढ-उतार व अभिनयाच्या सूक्ष्म बारकाव्यांद्वारे कथा सादर केल्याने रसिक मंत्रमुग्ध झाले आणि टाळ्यांचा कडकडाट झाला. यावेळी विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या मान्यवरांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कथालेखक बाळासाहेब देशमुख यांना 'स्वामी विवेकानंद साहित्यरत्न' पुरस्काराने पोलीस उपनिरीक्षक रतिलाल चौधर, संमेलनाध्यक्ष सुभाष सोनवणे व ॲड. राजेश कावरे यांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात आले. बाळासाहेब देशमुख यांचे साहित्यिक लेखन सातत्याने सुरू असून, कथाकथन कार्यक्रमांतून ते प्रबोधन व संस्कारांचे प्रतिबिंब कथेद्वारे प्रभावीपणे सादर करतात. याप्रसंगी कवी संमेलनाध्यक्ष आत्माराम शेवाळे, दिलीप कापसे, रूपचंद शिदोरे, बाळासाहेब मुतोंडे, शिवशाहीर शिवाजी थिटे, संदीप रासकर, रामदास कोतकर आदी ज्येष्ठ साहित्यिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप रासकर यांनी केले.


रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री | नोकरी विषयक | नावात बदल
आरोग्य विषयक | वाढदिवस | विवाह विषयक




निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

हॉटेल भाड्याने देणे
नगर-सोलापूर हायवेपासून पाच मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या कानडेमळा येथील सारसनगर चौकातील सुस्थितीत असणारे हॉटेल भाड्याने चालविण्यास देणे आहे. किमान ३० ते ५० लोक एकावेळी बसतील अशी पीओपी आणि लाईट फिटिंगसह बैठक व्यवस्था, व्हेज-नॉन, व्हेजसाठी स्वतंत्र किचन, सर्व किचन साहित्य टेबल, सोफे, पाण्याची व्यवस्था इत्यादीसह देणे आहे.
- संपर्क -
९०११११३७००

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफिसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# शैक्षणिक क्षेत्रात घाडगे पाटील यांचे कार्य अतुलनीय- गीतकार सौदागर

**नेवासा । रावसाहेब राशिनकर**



त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित तेलकुडगाव येथील घाडगे पाटील माध्यमिक विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम नुकताच उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून प्रसिद्ध चित्रपट गीतकार, अभिनेते, निसर्गकवी व पटकथालेखक बाबासाहेब सौदागर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानचे विश्वस्त चेतन चव्हाण होते.

यावेळी व्यासपीठावर विश्वस्त दादा घाडगे, विश्वस्त अण्णा घाडगे, कुसुमाग्रज गौरव पुरस्काराने सन्मानित काव्यरत्न प्रा. रावसाहेब राशिनकर, कारखान्याचे संचालक मच्छिंद्र म्हस्के, माजी सरपंच गोरक्षनाथ घोडेचोर, काका काळे, सरपंच सतिष काळे, सचिव मनीष घाडगे, चेअरमन अरुण घाडगे, सखाराम काळे, प्रशासक मनिषा राऊत, प्राचार्य भाऊसाहेब दुधाडे, विभागप्रमुख प्रवीण गोर्डे, अतुल कराड, आबासाहेब घाडगे, बाळासाहेब काळे, आकाश थावरी यांच्यासह पंचक्रोशीतील व वसतिगृहातील पालक व पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. विश्वस्त चेतन चव्हाण यांनी आपल्या मनोगतातून सर्वप्रथम स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ जयंतीच्या शुभेच्छा दिल्या. कोणत्याही यश-अपयशाचा विचार न करता स्पर्धेत उतरावे, दृष्टिकोन बदलून सातत्याने संघर्ष केल्यास यश निश्चित मिळते, असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना बाबासाहेब सौदागर म्हणाले की, मनात माणुसकीचा ओलावा असलेली माणसेच शैक्षणिक तीर्थक्षेत्र निर्माण करतात. शैक्षणिक क्षेत्रात घाडगे पाटील यांचे कार्य अतुलनीय आहे. सांस्कृतिक-अपंगत्वाची पार्श्वभूमी असतानाही दिशा बदलली की दशा बदलते. शिक्षणसंस्था उभारणे व ती सक्षमपणे चालवणे म्हणजे जळते निखारे पदरात घेऊन चालण्यासारखे आहे आणि हे कार्य घाडगे पाटलांची पुढची पिढी समर्थपणे पार पाडत आहे. ज्येष्ठांचे मार्गदर्शन हे न लिहिलेल्या समृद्ध ग्रंथांप्रमाणे अनुभव देणारे असते; त्यामुळे त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्रिमूर्तीच्या शिक्षणाच्या गंगेचा प्रवाह अविरत सुरू राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याप्रसंगी इयत्ता दहावी व बारावीच्या सर्व विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. वर्षभरातील विविध परीक्षा व स्पर्धांमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमासाठी प्रविण चौधरी यांचे संतकृपा मंडप साऊंड सिस्टीम, तर बाळासाहेब काळे यांनी ड्रोन, फोटोग्राफी व शूटिंगचे काम उत्तमरीत्या पार पाडले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तेलकुडगाव येथील त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व अहवाल वाचन ज्येष्ठ शिक्षक शरद कराड यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. नानासाहेब बांदल, गणेश काळे, रेणुका काळे व जयश्री भांगे यांनी केले, तर आभार प्रशासक मनिषा राऊत यांनी मानले.



# सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात जयंतीनिमित्त शालेय साहित्य वाटप

**संगमनेर । नितीनचंद्र भालेराव**

सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या जयंतीदिनानिमित्त तसेच स्व. सुरेश लुईस भोसले, स्व. संदीप साहेबराव चव्हाण व स्व. चंद्रकला साहेबराव शिरसागर यांच्या स्मरणार्थ प्रथम स्मृतीदिनाच्या औचित्याने जोर्वे येथे सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.

सामाजिक कार्यकर्ते दिलीप यादव, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष बंटी यादव, संदीप यादव, रावसाहेब यादव व संदीप दादू यादव यांच्या वतीने पारंपरिक दुखवटा या रूढीला फाटा देत, त्या खर्चातून जिल्हा परिषद शाळा व हायस्कूलमधील गरजू विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पेन्सिल आदी शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत समता विद्या मंदिर तसेच शिल्पता मधुकरराव संतुजी थोरात कनिष्ठ महाविद्यालय येथे शिष्यवृत्तीत प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वितरित करण्यात आले. यावेळी समता विद्या मंदिरचे प्राचार्य पोखरकर, आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नेते पँथर माणिक यादव, जोर्वे विकास सोसायटीचे चेअरमन विठ्ठल काकड, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष बंटी यादव, जोर्वे ग्रामपंचायतीचे माजी सदस्य राजेंद्र थोरात, सामाजिक कार्यकर्ते दिलीप यादव, अनिल गायकवाड, बाळासाहेब गायकवाड, अमित थोरात, अमोल क्षीरसागर, सागर यादव, दीपक यादव, श्रीकांत यादव, सुधीर चव्हाण, नयन भोसले, भैय्या क्षीरसागर आदी मान्यवर उपस्थित होते.

तसेच शिक्षक दिघे, गीते, काळे, प्राध्यापक बापू यादव, कानवडे एस.सी., भांगरे ए.डी., भांगरे बी.आर., डोळस, भरीतकर, पानसरे, शेवाळे, भांगरे, आंबरे, दिघे, सातपुते, जगताप, ढवळे तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन दिघे यांनी केले.



# कला कधीच उपाशी राहू देत नाही- प्रा. सोनवणे

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

माणसाला कला कधीच उपाशी राहू देत नाही, असे प्रतिपादन प्रा. राम सोनवणे यांनी केले. ते श्रीगोंदा तालुक्यातील चांडगाव येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) अंतर्गत श्रीगोंदा येथील महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय आयोजित हिवाळी विशेष श्रमसंस्कार शिबिरात ''मनोरंजनातून प्रबोधन'' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते. प्रा. सोनवणे यांनी आपल्या सादरीकरणातून तब्बल १९ पशुपक्ष्यांचे हुबेहूब आवाज सादर करत पशुसंवर्धन ही काळाची गरज असल्याचे प्रभावीपणे पटवून दिले. हे शिबीर १२ अधिक २ स्तरावर आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रसाळ होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून चांडगावचे सरपंच रविंद्र म्हस्के उपस्थित होते. हे श्रमसंस्कार शिबीर यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. भाऊसाहेब बुलाखे, प्रा. डॉ. देवेंद्र बहीरम, प्रा. संजय फटे, प्राध्यापिका कल्पना बागुल, प्रा. श्रद्धा जवळकर यांनी विशेष परिश्रम घेतले. प्रा. सोनवणे यांनी पशुपक्ष्यांचे हुबेहूब आवाज सादर करून सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींची मने जिंकली. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांचे आभार हिरडे यांनी मानले.

# शहर विकासासाठी श्रीरामपूरला भरीव निधी- पालकमंत्री विखे

**श्रीरामपूर । शफीक बागवान**



श्रीरामपूर नगरपरिषेदेच्या पाणी पुरवठा योजनेच्या कामामुळे दैनंदिन पाणीपुरवठ्यात आलेली समस्या, कॅनॉल लाईनच्या नोटीस यांसह विविध महत्वपूर्ण विषयांवर तोडगा काढावा म्हणून जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे यांची श्रीरामपूर शहरातील भाजप नेते व नगरसेवकांनी भेट घेतली.

श्रीरामपूर शहरातील विकासकामांना गती मिळावी, दररोज होणार पाणीपुरवठा सुरळीत राहावा, शहरातील कॅनोल भूमिगत करून त्यावर अतिक्रमण धारकांना गाळे मिळावे यांसह विविध मागण्यांसाठी भाजपचे जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, दीपक पटारे, माजी नगराध्यक्ष संजय फंड, शहराध्यक्ष जितेंद्र छाजेड, केतन खोरे, रवी पाटील, नगरसेवक दीपक चव्हाण, श्रीनिवास बिहाणी, अर्जुन दाभाडे, संजय गांगड, आशिष धनवटे, शशांक रासकर, संजय छल्लारे, सिद्धार्थ फंड, मनोज लबडे आदींनी भेट घेतली. यावेळी ना. राधाकृष्ण विखे यांनी श्रीरामपूर शहरातील नागरिकांनी पहिल्यांदाच भाजपच्या ११ नगरसेवकांना विजयी केल्याबद्दल समाधान व्यक्त केले. तसेच श्रीरामपूर शहराच्या विकासासाठी भरीव निधी देण्याचे आश्वासन दिले. शहराला पाण्याची समस्या जाणवू देणार नाही, अतिक्रमणधारकांना न्याय देण्याबाबत शिष्टमंडळाला ना. विखेंनी आश्वस्त केल्याने श्रीरामपूरच्या नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. यावेळी संदीप चव्हाण, मारुती बिंगले, पप्पू पटारे, बंडूकुमार शिंदे, विजय पवार, अमोल शेटे, राजू यादव आदींसह भाजप पदाधिकारी उपस्थित होते.

# छत्रपती शिवाजी विद्यालयात जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरी



**पाथर्डी । रयत समाचार**

श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, कासार पिंपळगाव येथे सोमवार, ता. १२ जानेवारी २०२६ रोजी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विनोद सरोदे होते.

अध्यक्षीय भाषणात विनोद सरोदे यांनी राजमाता जिजाऊ यांनी तलवारीपेक्षा तीक्ष्ण संस्कारांच्या बळावर शिवबाला घडवले, तेच संस्कार विद्यार्थ्यांनी अंगी बाणवून स्वतःचा सर्वांगीण विकास साधावा, असे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवाजी लवांडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन भागवत आव्हाड यांनी केले. कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक गोसावी यांनी योग्य मार्गदर्शन केले. तसेच सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली. यावेळी शिक्षक भागवत आव्हाड, किशोर बानकर, राजेंद्र वांढेकर, सचिन पवार, अभयसिंह चितळे, भाऊसाहेब गायकवाड, प्रशांत अकोलकर, भाऊसाहेब औसेकर, संजय शिंदे, संजय आठरे, तसेच गोबरे, दुशिंग, भांगरे, जाधव, शेख, लवांडे, वाघमोडे आणि बहुसंख्य पालकवर्ग उपस्थित होता.

# बळजबरीने पूजा साहित्य विक्री; लटकूसह दुकानदारावर गुन्हा दाखल

**नेवासा । विजय खंडागळे**



श्री क्षेत्र शनिशिंगणापूर येथे शनीभक्तांना बळजबरीने पूजा साहित्य विक्री करण्याच्या उद्देशाने अडवणूक करणाऱ्या लटकूसह संबंधित दुकानदारावर पहिल्यांदाच गुन्हा दाखल करण्यात आल्याने पंचक्रोशीतील ग्रामस्थांमध्ये समाधान व्यक्त होत असून पोलीस प्रशासनाचे कौतुक केले जात आहे. यापूर्वीही लटकूंच्या त्रासाविरोधात ग्रामस्थांनी अनेकदा आवाज उठवला होता. नुकतेच दोन दिवसांपूर्वी विभागीय आयुक्त तथा देवस्थानचे प्रशासक डॉ. प्रवीण गेडाम आणि जिल्हा पोलीस प्रमुख सोमनाथ घार्गे यांच्या आढावा बैठकीत मंदिर परिसरात सुरू असलेल्या गैरप्रकारांवर ठोस पावले उचलण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार शनीभक्तांना बळजबरीने अडवून पूजा साहित्य विक्री करणाऱ्या विक्रेत्यांसह लटकूंना रंगेहात पकडून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे लटकू तसेच पूजा साहित्य विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली आहे. या कारवाईनंतर शनीभक्तांना मनमोकळेपणाने व समाधानाने शनीदर्शन करता येत असल्याचे चित्र प्रथमच पाहायला मिळत असून, सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांचे जोरदार कौतुक केले जात आहे. अशीच मोहीम कायमस्वरूपी राबवावी, अशी मागणीही जोर धरू लागली आहे. राज्यभर हा संदेश पोहोचत असून देवस्थानाची प्रतिमा अधिक उजळत असल्याचे बोलले जात आहे. परिणामी, शनीभाविकांची गर्दी दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. दरम्यान, विलास चव्हाण, ऋषिकेश संपत पवार आणि उद्देश दिलीप गव्हाणे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिंगणापूर-राहुरी मार्गावर ठिकठिकाणी लटकू शनीभक्तांच्या वाहनांचा पाठलाग करून दमदाटी व अडवणूक करत विशिष्ट पूजा साहित्य दुकानांकडे नेण्याचा प्रयत्न करत असल्याच्या तक्रारी लक्षात घेऊन या मार्गावर बॅरिकेड्स लावण्यात आले असून ठिकठिकाणी पोलीस यंत्रणा तैनात करण्यात आली आहे. त्यामुळे लटकूंना मोठा आळा बसला आहे. मंदिर परिसरात ये-जा करताना अशा प्रकारचे कृत्य आढळल्यास तातडीने लटकू, पूजा साहित्य विक्रेते व दुकानमालकांवर कारवाई केली जाईल. वारंवार असे प्रकार निदर्शनास आल्यास वाहनतळ मालकावरही कारवाई करण्यात येईल, असा इशाराही श्री क्षेत्र शनिशिंगणापूर पोलीस ठाणेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष शेळके यांनी दिला आहे.



# आदर्श विद्या मंदिर येथे जिजाऊ, स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात

**नेवासा । विजय खंडागळे**

सोनई (शनिशिंगणापूर) येथील आदर्श विद्या मंदिरच्या प्राथमिक विभागात सोमवार, ता. १३ जानेवारी २०२६ रोजी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती मोठ्या उत्साहात व आनंदी वातावरणात साजरी करण्यात आली. या निमित्ताने विद्यालयातील काही विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची वेशभूषा परिधान केली होती. या उपक्रमात मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाले होते. सहभागी प्रत्येक विद्यार्थ्यांनी जिजामाता व स्वामी विवेकानंद यांच्या चारित्र्य व जीवनकार्यावर आधारित गोष्टी सादर करत उपस्थित विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्याची माहिती दिली. यावेळी दोन्ही थोर व्यक्तिमत्त्वांच्या प्रतिमांचे पूजन कार्यक्रमाचे अध्यक्ष रविराज तुकाराम गडाख यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच वेशभूषा स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांचे परीक्षणही अध्यक्षांनी केले. आपल्या मनोगतात त्यांनी राजमाता जिजाऊ यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना कशा प्रकारे घडवले, यावर प्रकाश टाकला. तसेच आजच्या विद्यार्थ्यांनी स्वामी विवेकानंदांचे कोणते गुण अंगी बाणावेत, याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे मुख्याध्यापक ए. बी. दरंदले यांनी केले. कार्यक्रमासाठी माजी मुख्याध्यापक बी. आर. खेसमाळसकर, तसेच माध्यमिक विभागाचे आर. एन. डाके व व्ही. व्ही. शिंदे यांनी परीक्षक म्हणून सहकार्य केले. कार्यक्रमाचे आभार पी. आर. दरंदले यांनी मानले. कार्यक्रमानंतर अध्यक्षांच्या हस्ते विद्यार्थ्यांना बिस्किट वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, प्रेरणा व राष्ट्रभक्तीचे बीज रोवले गेले.

# वाचनाची सवय म्हणजे व्यक्तिमत्त्वाची खरी शिदोरी- गाडेकर

**शेवगाव । लक्ष्मण मडके**



आजच्या स्पर्धात्मक युगात यशस्वी होण्यासाठी केवळ गुण नव्हे, तर व्यापक वाचन संस्कृतीची नितांत गरज आहे. वाचनातूनच विचारांची खोली, अभिव्यक्तीची ताकद आणि व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडतो, असे प्रतिपादन शिक्षण विस्तार अधिकारी शंकर गाडेकर यांनी केले.

प्रवरा मेडिकल ट्रस्टच्या आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, शेवगाव येथे आयोजित कै. सिंधूताई एकनाथराव विखे पाटील स्मृती राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओंकार रसाळ होते. त्यांनी प्रवरा परिवाराची शैक्षणिक वाटचाल आणि सामाजिक बांधिलकी अधोरेखित करत, वक्तृत्व स्पर्धा ही विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाचा व नेतृत्वगुणांचा पाया मजबूत करणारी प्रक्रिया असल्याचे नमूद केले. त्यांनी सर्व स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र विखे पाटील, विश्वस्त सुवर्णा राजेंद्र विखे, सहसचिव मोनिका सावंत, विश्वस्त ध्रुव राजेंद्र विखे तसेच कार्यकारी संचालक पंजाबराव आहेर यांचे मार्गदर्शन लाभले. वक्तृत्व स्पर्धेचे परीक्षण प्रा. सोपान नवथर आणि दैनिक सकाळचे पत्रकार राजू घुगरे यांनी केले. यावेळी आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष पवळे, पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील सीबीएसई स्कूलच्या प्राचार्या वर्षा दारकुंडे, डॉ. किरण वाघ यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या राज्यस्तरीय स्पर्धेत पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाडा विभागातून एकूण ४७ स्पर्धकांनी सहभाग घेतला.

कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजन समितीचे अध्यक्ष प्रा. अजित भालसिंग यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. गणेश शेळके यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. प्रीती शिंनगारे व प्रा. रामदास कातकडे यांनी केले. विचारांना व्यासपीठ आणि शब्दांना धार देणाऱ्या या वक्तृत्व स्पर्धेमुळे शेवगावच्या शैक्षणिक वातावरणात वैचारिक उत्साहाचे नवे पर्व सुरू झाले आहे.



# लोकशाही उत्सव

अहिल्यानगर महानगरपालिका निवडणूक – २०२५-२६



## महानगरपालिका निकालावर आधारित

### आकाशवाणीचा विशेष कार्यक्रम : नगर निवाडा २०२६

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक निकालांचे विश्लेषण आणि निकालावर आधारित ''नगर निवाडा २०२६'' या विशेष कार्यक्रमाचं लाईव्ह प्रसारण आकाशवाणी अहिल्यानगर केंद्रावरून शुक्रवारी ; १६ जानेवारीला सकाळी नऊ वाजल्यापासून करण्यात येणारं आहे.हा विशेष लाईव्ह कार्यक्रम जिल्ह्यातील श्रोत्यांना आकाशवाणी अहिल्यानगर केंद्र १००.१ मेगा हर्ट्झ या रेडिओ फ्रिक्वेंसीसह न्यूज ऑन एआयआर या मोबाईल ॲपवर अगदी जगभरात कुठेही ऐकता येणार आहे. नगर निवाडा २०२६ कार्यक्रमातून जिल्हा; राज्य आणि देश विदेशातील अहिल्यानगरवासियांना आपल्या महानगरपालिकेचे विश्वासार्ह निवडणूक निकाल आकाशवाणीच्या माध्यमातून घर बसल्या ऐकता येतील. या कार्यक्रमात अहिल्यानगरच्या राजकीय सामाजिक परिस्थितीची जाण असणारी विविध क्षेत्रातील तज्ञ मंडळी सहभागी होणार असल्याची माहिती आकाशवाणी अहिल्यानगर केंद्राचे कार्यक्रम प्रमुख सुदाम बटुळे यांनी दिली.

# नवनाथ कातोरे ठरणार 'जायंट किलर'?

## प्रभाग ८ मध्ये राजकीय समीकरणे पलटण्याची शक्यता

**अहिल्यानगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिका निवडणूक प्रचाराची रणधुमाळी काल थांबली असली, तरी प्रभाग क्रमांक ८ मध्ये मात्र राजकीय वातावरण चांगलेच तापलेले आहे. प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यातील एकूण हालचाली, मतदारांचा कल, जातीय समीकरणे आणि उमेदवारांची ताकद पाहता या प्रभागात शिवसेना धनुष्यबाणाचे नवनाथ कातोरे हे 'जायंट किलर' ठरण्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली. या प्रभागात सर्वसाधारण पुरुष 'ड' प्रवर्गातून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे कुमार वाकळे हे मतदानाआधीच बिनविरोध निवडून आले.

मात्र उर्वरित तीन जागांसाठी अत्यंत चुरशीची लढत होत असून, विशेषतः सर्वसाधारण पुरुष 'क' प्रवर्गातील लढत संपूर्ण निवडणुकीचे लक्ष वेधून घेत आहे. या जागेसाठी राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून बाबासाहेब नागरगोजे तर शिवसेनेकडून नवनाथ कातोरे यांच्यात थेट सामना होत आहे. प्रभागाचा विस्तार, मतदारांशी असलेला थेट संपर्क, स्थानिक प्रश्नांवरील भूमिका, स्थानिक उमेदवार आणि प्रचारातील आक्रमकता पाहता सध्या नवनाथ कातोरे यांचे पारडे जड असल्याचे चित्र दिसत आहे. जर निकाल अपेक्षेप्रमाणे लागला, तर हा निकाल राष्ट्रवादी अजित पवार गटासाठी मोठा धक्का मानला जाईल, अशी चर्चा आहे.



प्रचाराच्या अखेरच्या टप्प्यात नवनाथ कातोरे यांनी प्रभागातील प्रत्येक गल्ली, वस्ती आणि सोसायटीत थेट संपर्क साधत आक्रमक प्रचार केला. स्थानिक प्रश्न, मूलभूत सुविधा, पाणीपुरवठा, रस्ते, ड्रेनेज आणि नागरी समस्या यांवर त्यांनी ठोस भूमिका मांडल्याने मतदारांमध्ये त्यांच्याबाबत सकारात्मक वातावरण तयार झाल्याचे दिसून येत आहे. विशेषतः तरुण मतदार आणि पारंपरिक शिवसैनिकांचा मोठा पाठिंबा कातोरे यांना मिळत असल्याचे चित्र आहे. या प्रभागात शिवसेनेची संघटनात्मक ताकद आणि स्वतःची सक्रिय यंत्रणा प्रभावीपणे काम करत असल्याचे प्रचारादरम्यान दिसून आले. बूथ पातळीवर नियोजन, कार्यकर्त्यांची उपस्थिती आणि मतदारांपर्यंत पोहोचण्याची रणनीती यामुळे नवनाथ कातोरे यांची मोहीम इतर उमेदवारांच्या तुलनेत अधिक शिस्तबद्ध आणि प्रभावी ठरली आहे. राष्ट्रवादी अजित पवार गटाचे उमेदवार बाबासाहेब नागरगोजे यांचेही प्रयत्न कमी नाहीत. मात्र शेवटच्या टप्प्यात प्रचाराचा जोर, जनसंपर्काची व्याप्ती आणि स्थानिक पातळीवरील प्रतिसाद पाहता नवनाथ कातोरे यांनी आघाडी घेतल्याचे संकेत राजकीय जाणकार व्यक्त करत आहेत. या लढतीचा निकाल लागल्यास प्रभागातील राजकीय समीकरणांवर त्याचा थेट परिणाम होणार आहे.


दरम्यान, ओबीसी महिला आणि अनुसूचित जाती महिला प्रवर्गातील लढतींवरही नवनाथ कातोरे यांच्या लढतीचा अप्रत्यक्ष परिणाम होणार असल्याचे बोलले जात आहे. एकूणच प्रभाग ८ मध्ये शिवसेनेचे वातावरण तयार झाले असून, नवनाथ कातोरे यांच्या विजयाची चर्चा केवळ कार्यकर्त्यांपुरती मर्यादित न राहता विरोधी गोटातही होत आहे. १५ तारखेला होणाऱ्या मतदानानंतर अवघ्या काही तासांतच या चर्चांना पूर्णविराम मिळणार आहे. मात्र निकालापूर्वीच प्रभाग क्रमांक ८ मध्ये नवनाथ कातोरे हे 'जायंट किलर' ठरणार का, याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. निकालाच्या दिवशी हा अंदाज प्रत्यक्षात उतरतो की राजकीय गणिते बदलतात, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

### सावेडी प्रभाग क्र.७ मधे होणार परिवर्तन?

# पाणीपट्टी वाढ व विखेंच्या ३ कोटी रूपये पाणीपट्टी माफीचा बसणार झटका?

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिका प्रचाराची रणधुमाळी काल संध्याकाळी ५ वाजता संपली. महानगरपालिकेची ही निवडणूक वेगवेगळ्या कारणांनी गाजली. शिवसेना नेते अनिल शिंदे यांच्यावर प्रशासनाने दडपण आणल्याने त्यांना थेट हृदयविकाराचा झटका आला नी हॉस्पिटलमधे दाखल करावे लागले त्यामुळे मतदारांमधे संतापाची लाट उसळली.फ २००३ सालच्या मनपा स्थापनेनंतर थेट २०२५ साली महिलांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न असलेल्या पाणीपट्टीत भरघोस वाढ करण्यात आली. ही वाढ शहरातील नागरिकांच्या मुळावर उठली आहे. ३६५ दिवसांपैकी १५० दिवसही पुरेसे पिण्याचे पाणी मनपा देत नाही. तरीही पाणीपट्टी वाढ केल्याने महिलावर्गात संपात दिसून येतो. मनपा प्रशासनाने पाणीपट्टी वाढीचा निर्णय का घेतला हे शहरातील जनतेला माहिती पडले नाही. मनपा ही



नगर महानगरपालिका, अहमदनगर
नगरसचिव विभाग

महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०१ प्रस्ताव क्रमांक : ०४ दिनांक:- ११/०६/२०२१

प्रस्तावाचा विषय :- महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १३४ व १३५ अन्वये विनंती अर्ज बाब पद्मश्री.डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशन विळद घाट अहमदनगर यांचे संस्थेस पाणी बील आकारणी का[…] मा.महासभेची मंजुरी मिळणे बाबत

प्रस्तावाचा मजकुर :-


संदर्भ - १) मा.महासभा प्रस्ताव क्र. ६० दि. २९/०३/२०१६ अन्वये पारीत अंदाजपत्रकीय ठराव. (पाणी पट्टी दरवाढ बाबत ठराव)
२) पा पु जा.क्र.१२०६ दि.३१/०१/२०१७ रोजीचे कार्यालयीन आदेश .(पाणी पट्टी दरवाढ कार्यालयीन आदेश)
३) इकडील जा.क्र. पा पु ०६ दि. ०१/०४/२०१७ रोजीचे पत्र (संस्थेस दर वाढ बाबत पत्र)
४) संचालक.आय.बी.एम.आर.डी. विळद घाट, अहमदनगर यांचे दि.१०/०४/२०१७ चे पत्र.
५) प्राचार्य.अभियांत्रिकी महाविद्यालय, विळद घाट, अहमदनगर यांचे दि.१०/०४/२०१७ चे पत्र.
६) प्राचार्य.औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालय विळद घाट,अहमदनगर यांचे दि.१०/०४/२०१७ चे पत्र.
७) प्राचार्य.डॉ.विखे पाटील मेमोरिअल हॉस्पीटल व मेडिकल कॉलेज विळद घाट, अहमदनगर यांचे दि.१०/०४/२०१७
८) इकडील जा.क्र. पा पु ९७ दि. २७/०४/२०१७ रोजीचे पत्र ( पाणी पट्टी दरवाढची कमी करण्याची मागणी अन्याय केले बाबत पत्र )
९) संचालक.आय.बी.एम.आर.डी. विळद घाट, अहमदनगर यांचे दि.१२/०७/२०१७ चे पत्र.
१०) प्राचार्य.अभियांत्रिकी महाविद्यालय, विळद घाट, अहमदनगर यांचे दि.१२/०७/२०१७ चे पत्र.
११)प्राचार्य.औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालय विळद घाट, अहमदनगर यांचे दि.१२/०७/२०१७ चे पत्र.
१२) प्राचार्य.डॉ.विखे पाटील मेमोरिअल हॉस्पीटल व मेडिकल कॉलेज विळद घाट, अहमदनगर यांचे दि.१२/०७/२०१७
१३) इकडील जा.क्र. पा पु ५६३ दि. १०/०९/२०१७ रोजीचे पत्र ( पाणी पट्टी दरवाढची कमी करण्याची मागणी अन्याय केले बाबत पत्र )
१४) इकडील पा पु जा.क्र.७१७ दि.२७/०९/२०१७ रोजीची नोटीस ( पाणी पट्टी थकबाकी रक्कम भरणे बाबत नोटीस)
१५) कोर्ट विभाग जा.क्र.१४७ दि १७/१०/२०१७ रोजीचे पत्र ( विखे पाटील कॉलेज विरूध्द महानगरपालिका अ.नगर बाबत टॅक्स अपील )
१६) इकडील पा पु जा.क्र.१४९० दि.२८/०२/२०१९ रोजी नोटीस( पाणी पट्टी थकबाकी रक्कम भरणे बाबत नोटीस)

तोट्यात आहे हे कारण दिले जाते परंतु मनपा ही नफ्यात आणायला ही काही कार्पोरेट कंपनी नाही तर लोकांना लाईट, स्वच्छता, पाणी देण्या बांधील असलेली स्थानिक स्वराज्य संस्था आहे. त्यामुळे नफा तोट्याचा विचार न करता सेवा देणे हे प्रथम कर्तव्य आहे. जो तोटा होईल तो राज्य सरकारने भरून द्यायचा असतो. पर्से पिण्याचे पाणी द्यायचे काम प्रशासनाने करायचे असते.

महिलांचा जिव्हाळ्याचा प्रश्न असलेली पाणीपट्टी वाढ हा शहरभर कळीचा मुद्दा ठरला आहे. या पाणीपट्टी वाढीमागे सत्ताधारी असल्याची लोकांची खात्री होत आहे. कारण भारतीय जनता पक्षाचे तत्कालिन महापौर बाबासाहेब वाकळे, नगरसेवक रविंद्र बारस्कर आणि महेंद्र तथा भैय्या गंधे यांनी मनपा सचिव कार्यालय सका-०१, प्रस्ताव क्र.०४, दि.११.०६.२०२१ या ठरावाद्वारे महानगर हद्दीबाहेरील विखे फौंडेशन या संस्थेस तीन कोटी रूपये पाणीपट्टीत सवलत दिली तसा ठराव मंजूर केला.

ही बाब शहरातील लाडक्या बहिनींना संताप देणारी ठरली. श्रीमंतांच्या पाणीपट्टी माफीचे पाप सर्वसामान्यांच्या माथी मारण्याचा हा प्रकार असल्याचा सर्वत्र संताप दिसून येत आहे. पाणीपट्टी वाढ व विखेंच्या ३ कोटी रूपये पाणीपट्टी माफीचा झटका या निवडणूकीत बसणार असल्याची प्रभाग क्र.७ सह शहरभर चर्चा आहे.

प्रभाग क्र.७ मधे शिवसेनेचे धनंजय गोलवड, सारीका भुतकर व गोरख बोरूडे नशिब आजमावत आहेत. त्यांना मिळणारा प्रतिसाद पहाता यंदा परिवर्तन होणार असल्याची शहरभर चर्चा आहे.



-१०-

करून थकीत रक्कम वसुल होण्याच्या दृष्टिने पद्मश्री.डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशन विळद घाट अहमदनगर या संस्थेस रक्कम रुपये १००/- प्रति घन मीटर या दराने पाणी बील आकारणी करणेस ही सभा मान्यता देत आहे. सदर पाणीबील आकारणी दरवाढ झालेल्या तारखेपासुन (दिनांक ०१/०४/२०१६ पासुन) वसुल करण्यांत यावी. यास ही सभा मान्यता देत आहे.
नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.


सुचक :- मा.श्री. रविंद्र रावसाहेब बारस्कर
अनुमोदक :- मा.श्री.महेंद्र (भैय्या) मोहिनीराज गंधे,
ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# प्रभाग ८ मध्ये शिवसेनेचे भव्य शक्तीप्रदर्शन

## महिला व युवकांचा मोठा प्रतिसाद





**अहिल्यानगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराचा काल शेवटचा दिवस असताना प्रभाग क्रमांक ८ मध्ये शिवसेना (शिंदे गट) चे उमेदवार नवनाथ मच्छिंद्र कातोरे यांनी आपल्या सहकार्य उमेदवारांसह भव्य शक्तीप्रदर्शन करत प्रचाराची सांगता केली.

या प्रचार फेरीला महिलांची लक्षणीय उपस्थिती लाभली असून युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसादही मोठ्या प्रमाणात पाहायला मिळाला.

ही प्रचार फेरी गणेश चौक, राघवेंद्र स्वामी मंदिर, कातोरे नगर, केशव कॉर्नर, बोल्हेगाव येथून सुरू होत आंबेडकर चौक, पितळे कॉलनीसह प्रभागातील बहुतांश भागातून मार्गक्रमण करत काढण्यात आली. संपूर्ण परिसर 'शिवसेना जिंदाबाद'च्या घोषणांनी दुमदुमून गेला.

प्रचार फेरीदरम्यान शिवसेना (शिंदे गट) चे प्रभागातील तीनही उमेदवार एकत्रितपणे उपस्थित होते.

नागरिकांनी अनेक ठिकाणी उमेदवारांचे औक्षण करत उत्साहात स्वागत केले, तर काही चौकांमध्ये फटाके फोडून आनंद व्यक्त करण्यात आला.

प्रचार फेरीच्या अग्रभागी ढोलवाद्यांचा ताफा ढोल-ताशांच्या गजरात वातावरण तापवत होता. चौकाचौकात उमेदवारांच्या समर्थनार्थ जोरदार घोषणा देण्यात येत होत्या.

या शक्तीप्रदर्शनातून प्रभागात शिवसेनेच्या उमेदवारांना मिळणारा वाढता पाठिंबा स्पष्टपणे दिसून आला.

नवनाथ कातोरे यांनी यावेळी बोलताना मतदारांनी दिलेल्या प्रतिसादाबद्दल समाधान व्यक्त करत, ''प्रभागातील विकास, मूलभूत सुविधा आणि जनतेच्या प्रश्नांसाठी आम्ही कटिबद्ध आहोत. मिळणारा पाठिंबा हा





आमच्या कामाची पावती आहे,'' असे सांगितले.

प्रचाराच्या शेवटच्या दिवशी झालेल्या या भव्य शक्तीप्रदर्शनामुळे प्रभाग क्रमांक ८ मधील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून निवडणुकीत चुरशीची लढत होण्याचे संकेत मिळत आहेत.

# प्रभाग ८ मध्ये बदलाची चाहूल; मीना देठेंच्या प्रचाराला लंके यांची साथ

**अहिल्यानगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिका निवडणूक प्रचाराच्या शेवटच्या दिवशी प्रभाग क्रमांक ८ मधील राजकीय वातावरण चांगलेच तापले होते. अनुसूचित जाती महिला प्रवर्गातून राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) यांच्या उमेदवार मीना संजय देठे यांच्या प्रचारासाठी नगर दक्षिणचे खासदार निलेश लंके यांनी प्रत्यक्ष मैदानात उतरून नागरिकांशी संवाद साधला. खासदार लंके यांच्या उपस्थितीमुळे या प्रभागातील लढत अधिकच प्रतिष्ठेची बनली आहे. यावेळी खासदार निलेश लंके यांच्यासोबत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे शहर



जिल्हाध्यक्ष अभिषेक कळमकर, निलेश मालपाणी, पाटील सर, शिक्षक सेनेचे जिल्हाप्रमुख अंबादास शिंदे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रचारादरम्यान खासदार निलेश लंके यांचा ज्येष्ठ नागरिक सुरेश देठे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

प्रचाराच्या अंतिम टप्प्यात मीना देठे यांनी घेतलेली मुसंडी, घरोघरी जाऊन साधलेला थेट जनसंपर्क, स्थानिक प्रश्नांवर केलेली ठोस मांडणी आणि पक्षाची संघटित ताकद यामुळे त्यांचा प्रचार प्रभावी ठरत असल्याचे चित्र आहे. यावेळी शुभम देठे, सनी देठे, प्रफुल देठे, सुरेश देठे, राजू देठे, अनिल देठे, सुनील देठे, आकाश देठे, मोहन देठे, किरण देठे यांच्यासह महिला कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती. या प्रभागात राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्या सुनिता भिंगारदिवे आणि शिवसेना (शिंदे गट) यांच्या प्रियंका प्रभुणे यांच्यातही जोरदार लढत पाहायला मिळत असली, तरी मीना देठे यांचा वाढता जनसंपर्क, स्थानिक पाठिंबा आणि प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यात मिळालेली प्रमुख नेत्यांची साथ लक्षवेधी ठरत आहे. काही अपक्ष उमेदवारही रिंगणात असले, तरी मुख्य लढत त्रिकोणीच असल्याचे स्पष्ट होत आहे. प्रचार संपल्यानंतर आता मतदारांचा कौल काय लागतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. निवडणुकीनंतर दुसऱ्या दिवशी निकाल जाहीर होणार असून, प्रभाग क्रमांक ८ मधील अंतिम चित्र तेव्हाच स्पष्ट होणार आहे. मात्र सध्याच्या घडीला मीना देठे यांचे पारडे जड असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगत आहे.